

आजी आणि बाळ




आजी आणि बाळ

मराठी : अश्विनी बर्वे





आजी आणि बाळ




आजी एका जंगलातून जात होती. अचानक थांबली. तिने काहीतरी ऐकले. आजीने इकडे-तिकडे बघितले. पण तिला काहीच दिसले नाही. मग आजीने वर पाहिले आणि तिला खरंच काहीतरी दिसलं.



"एक बाळ!“ ती म्हणाली.
"एक बाळ झाडाला लटकत होते, आता बोला.”
बाळ आपल्या झोळीत पुढे-मागे हलत होते.
“आं!“ बाळ रडले. “आं आं!”
"अरे बाळा,“ आजी म्हणाली.
“मी आत्ता तुला त्यातून उतरवते.”

आजी झाडावर चढली, ती वर चढली आणि
बाळाला खाली घेवून आली. “आं आं! बाळ
म्हणाले. “आजी तुझी काळजी घेईन.”
बाळा रडायचे थांबले. “तुला झाडावर कोणी
टांगले,” आजीने विचारले.



आजी म्हणाली, “बरं झालं तू त्या इंडियन लोकांच्या हाती लागला नाही.” “नाहीतर फार भयंकर झालं असतं. तू भाग्यशाली आहेस मी इथं पोहचली. मी तुला आता माझ्या घरी घेऊन जाईन.” आजी पुढे गेली मग परत थांबली..

“मला वाटतं मला कशाचा तरी आवाज येतोय,” आजी म्हणाली.

तिने चारी बाजूला बघितलं. तिला काही दिसलं नाही.पण काहीतरी होतं. काहीतरी मोठं आणि राखाडी रंगाचं. मग ती गोष्टीने घुर-घुर आवाज केला.

"ठीक आहे," आजी म्हणाली.
“बाहेर ये, नाहीतर मी गोळी घालेन.”
एक राखाडी डोकं झाडाच्या मागून
बाहेर आलं. त्याचे दोन मोठे-मोठे डोळे
आजीकडे एकटक बघत होते. “अरे,
एवढं मोठं कुत्रं,” आजी म्हणाली.





“चल माझ्या बरोबर, मला एक कुत्रा हवाच होता. आता या बाळाला पण मदत कर,” आजी म्हणाली. राखाडी रंगाचा तो प्राणी झुडुपातून बाहेर आला. तो आजीकडे बघून गुरगुरायला लागला. “अरे, आवाज बंद कर,” आजी म्हणाली. त्या प्राण्याने आपला जबडा बंद केला..

“चल, एक चांगला कुत्रा हो,” आजी म्हणाली. “नाहीतर मी तुझी चांगली धुलाई करेन. तो प्राणी परत गुरगुर करायला लागला. “ठीक आहे,” आजी म्हणाली. “तू मार खाऊनच ठिकाणावर येशील,” मग आजीने त्या प्राण्याच्या नाकावर जोरात बंदूक मारली.





मग त्या प्राण्याने गुरगुरणे बंद केले. “चल, आता ठीक आहे,” आजी म्हणाली. “पण मी तुला घरी कशी घेवून जाऊ?” आजीने विचार केला आणि मान हलवली. “मी तुझ्या गळ्यात माझ्या ॲप्रनच्या नाडी बांधते. तिचा दोरी म्हणून चांगला उपयोग होईल.”



आजीने बाळाला खाली ठेवले. तिने ॲप्रन काढला, त्याची नाडी त्या राखाडी रंगांच्या प्राण्याच्या गळ्यात बांधली. राखाडी प्राणी फक्त तिच्याकडे बघत राहिला. हो अजून कोणीतरी आजीकडे बघत होते. आता एका इंडियनचे डोळे आजीकडे बघत होते. पण आजीला तो दिसला नाही.

आजी बाळ आणि बंदुक उचलून निघाली. इंडियन्स आपल्या रस्त्याने आले. घरात आजीला एक चांगली दोरी मिळाली. तिने राखाडी रंगाच्या प्राण्याला टेबलाला बांधलं. तिने बाळाला अंथरुणावर ठेवलं. “आं-आं “बाळ रडलं. “गुर्र-गुर्र “राखाडी रंगाच्या प्राण्याने केलं.



“आता सांगा, आजी म्हणाली, “तुम्हा दोघांना भूक लागली आहे का? मी तुमच्या खाण्याची व्यवस्था करू शकते.” राखाडी रंगाच्या प्राण्यासाठी तिने थोडं मांस आणलं. बाळासाठी तिने दूध आणलं “हे बघा,” ती म्हणाली. “खाल्ल्यावर तुम्हांला छान वाटेल.” बाळाने “हो“ म्हटलं. आणि कदाचित त्या राखाडी रंगाच्या प्राण्याने सुद्धा तसंच काहीसं म्हटलं असावं. ”बघ लहान बाळ झोपलं सुद्धा,” आजी म्हणाली. मग तिने राखाडी प्राण्याकडे पाहिलं, “आता मी तुझ्याकडे बघते, ती म्हणाली. “सगळ्यात आधी मी तुला एक नाव देते.

आजीने काहीवेळ विचार केला. “बास!” ती म्हणाली, “ऐडा! ऐडा! हे नाव तुझ्यासाठी चांगलं आहे. “गुर्र,” ऐडा म्हणाला.



“शांत बस!” आजी म्हणाली. “नाहीतर मला तुझी परत धुलाई करावी लागेल.”

“आं!” बाळ म्हणाले.

“हे बघ तू काय केलं ते,” आजी म्हणाली. “चल ठीक आहे, जे केलं ते केलं,” आजीने बाळाला उठवत म्हटलं. “चल मी तुला धुवून काढते,” ती म्हणाली. “बाळाला सारखं-सारखं स्वच्छ करावं लागतं.” मग आजीने बाळाला परत अंथरुणावर ठेवलं. “मी थोडं पाणी पिऊन येते,” आजी म्हणाली. “ऐडा तोपर्यंत तू बाळाकडे लक्ष ठेव.”


बाळाकडे अजून कोणीतरी बघत होतं. डोळे, इंडियन चे डोळे, खिडकीतून बाळाकडे बघत होते. “अरे नाही!” इंडियन म्हणाला. “एक लांडगा, मतलबी लांडगा!” आजी पाणी घेवून परत आली. “हे भांडं पुरेसे आहे,” ती म्हणाली. मग तिने त्या भांड्यात पाणी टाकलं.





इंडियन ने विचार केला.
“मला अजून मदतीची गरज लागेल,” तो म्हणाला. मग इंडियन आपल्या लोकांकडे धावत गेला. “चला चला लवकर!” तो लोकांना म्हणाला.
“लवकर चला. ती आजी परत खोड्या काढत आहे.”

"हआम्हांला सांग, आम्हांला सांग.” इंडियन म्हणाले.
“ती आता काय करत आहे?” आजीजवळ आपलं एक मूल आहे. इंडियन म्हणाला..



"अरे नाही!" बाकी इंडियंस रडत म्हणाले. “ती त्या बाळाला शिजवून त्या लांडग्याला खायला घालायला निघाली आहे.” इंडियन म्हणाला.

“काय?” प्रमुख ओरडला. “ती असं अजिबात करू शकत नाही.” “नाही नाही!” बाकी इंडियन म्हणाले. “आपल्याला तिला थांबवणे भाग आहे.” “पण कसे?” प्रमुख म्हणाला. “तुम्हांला माहित आहे ती स्त्री अडचणी निर्माण करू शकते.” एक इंडियन म्हणाला, “की आपल्याला तिला गोळी मारावी लागेल असं होवू शकतं.” “नाही नाही!”प्रमुख म्हणाला. “आपण असं करू शकत नाही.”



“पण असं काही करावं लागेल ज्याने ती थांबेल.” एक इंडियन म्हणाला. “हो,” प्रमुख म्हणाला. “पण हे काम आपल्याला लवकर करावं लागेल. आपण सर्वजण विचार करू. सगळेजण विचार करा, विचार, विचार करा.”




पण आजीला विचार करावा लागला नाही.तिला माहीत होते की तिला भूक लागली आहे. तिने बाळाला आंघोळ घालण्याच्या ऐवजी स्वतःसाठी तिने चहा आणि टोस्टकेले. बाळ म्हणाले, “वा!” आणि ते परत झोपी गेले. ऐडा बसली आणि बाळाकडे बघत राहिली. “बघ किती गोड आहे ते?” आजी म्हणाली. मग आजीचा चहा संपला. मग ती आपल्या खुर्चीवर बसली.

पण ऐडा डोकं हलवत राहिली. तिला गळ्यात दोरी बांधलेली आवडत नव्हती. त्यातून तिला मोकळं व्हायचं होतं. ऐडा ती दोरी चावू लागली.



इंडियंस आपलं डोकं हलवत होते.
“आता,” प्रमुख म्हणाला. “आपल्याला त्या आजीच्या घरी गुपचूप जावून लवकर बाळाला घेवून यायला हवं.”

“हो!" बाकी इंडियंसनी ओरडून सहमत असल्याचे सांगितले. ”आजीला कळण्याच्या आतच आपण बाळाला हुसकावून घेवून येवू.” आता आजीला हलकीशी डुलकी लागली. आता ऐडा दोरी चावत नव्हती. आता ती मुक्त होती. ती खोलीचे चारी कोपरे हुंगत होती. बाहेर इंडियन्स होते. ते गपचूप, हळूवार पावलांनी आजीच्या घराच्या चारी बाजूला फिरत होते. ऐडाने हुंगत अंथरूण शोधले.



“गुर्र!” ऐडा म्हणाली. “आं, आं!” बाळ रडले. इंडियनची आजीच्या दरवाज्याजवळ गर्दी झाली. “लांडगा!” ते ओरडले. “तो लांडगा आपल्या बाळाला खाईल.” “गुर्र!” ऐडा म्हणाली. “आं!आं!” बाळ रडले. ते ऐकून आजी उठली.


“लांडगा!” त्यांनी म्हटलं. “कोणता लांडगा!” “तो लांडगा” इंडियन ओरडले. “ऐडा, आजी म्हणाली. “ऐडा, एक लांडगा?” “गुर्र!” ऐडा म्हणाला. “अरे बापरे! मी विश्वास ठेवू शकते की तो एक लांडगा आहे.” आजी म्हणाली.



ऐडाने बाळाला हुंगले. “आ!” बाळ रडले. “नाही नाही!” आजी ओरडली. “तू बाळाला नाही घेवू शकत.” आजी पळत अंथरुणाजवळ गेली.लगेच तिने बाळाला उचलले. मग ती पलंगावर चढली. “दूर हो मुर्खा,” आजी ओरडली.



ऐडाने आपला जबड़ा उघडला. त्याने आपले दोन्ही पंजे पलंगावर ठेवले. “गुर्र” तो गुरगुरला. “खाली उतर,” आजी ओरडली. पण ऐडा आणखीन जोरात गुरगुरू लागली. अचानक आजी मांडणी कडे गेली आणि तिने बंदुक उचलली. “गोळी मारा, गोळी मारा,” इंडियन ओरडले.



“नाही नाही!” प्रमुख म्हणाला. “नाहीतर ती आपल्या बाळाला गोळी मारेन.” “मुर्खा सारखं बोलू नका,” आजी म्हणाली. “ह्या बंदुकीतून गोळी उडत नाही. हे सगळ्यांना माहित आहे.” मग आजीने ऐडाच्या डोक्यावर मारले. ऐडा खाली बसली.

दोन इंडियन पळत आत आले. त्यांनी घाईने ऐडाला बांधलं. “आम्ही तिला परत जंगलात घेवून जातो.” त्यांनी म्हटलं. “हुर्रे,” इंडियन ओरडले. “आजी साठी सुद्धा हुर्रे. आजीने आपल्या बाळाला वाचवले. आजी खूप चांगली आणि प्रामाणिक आहे.



“आता तुम्ही लोक तुमचा हल्ला-गुल्ला बंद करा," आजी म्हणाली. “बाळाला आवाज आवडत नाही. तुम्ही माझ्या बाळाला त्रास देवू नका.” “नाही नाही! ही माझी मुलगी आहे,”एक इंडियन महिला म्हणाली. “कृपया माझी मुलगी मला परत दे.” “तुझी मुलगी?” आजी म्हणाली. “काय ही तुझी मुलगी आहे?” बाळाने आपल्या आईचा आवाज ओळखला. “आं” बाळ खुशीने ओरडले. “ठीक आहे, मला वाटतं हे तुझंच बाळ आहे.” आजी म्हणाली. “पण तू तिला झाडाला टांगून का ठेवलं होतं? हा फार मुर्खपणा आहे.” आजीने बाळाला त्यांच्याकडे सोपवलं.

.

“पुढच्या वेळी जर मला एखादं बाळ झाडाला टांगलेलं दिसलं तर मी ते माझ्याकडेच ठेवेन.” आजी म्हणाली.





त्यानंतर आजी जेव्हा जंगलातून जात असे तेव्हा ती नेहमीच झाडाला बाळ टांगलं आहे का? हे बघत असे.

पण झाडाला टांगलेलं बाळ तिला कधी सापडलं नाही. इंडियन आता बाळाला झाडाला टांगत नाही.

.

समाप्त

